# धुळे महानगरपालिका, धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त

नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ४६

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांकः-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समितीची सभा **गुरुवार दिनांक ०५/०२/२०२६ सकाळी ११-३० वाजता स्व. स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्री.नितीन कापडणीस यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्री. नितीन कापडणीस | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्री. हेमंत निकम | उपायुक्त |
| ३. | श्रीमती स्वालिहा मालगावे | उपायुक्त |
| ४. | श्री राजेंद्र माईनकर | सहा. आयुक्त |
| ५. | श्री सागर जकातदार | सहा. आयुक्त |
| ६. | श्री. बाळासाहेब तट्टू | मुख्य लेखाधिकारी |
| ७. | श्री. शाहेद शेख | मुख्य लेखापरिक्षक |
| ८. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ९. | श्री चंद्रकांत उगले | अभियंता बांधकाम |
| १०. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य.अभियंता स्थापत्य विभाग |
| ११. | श्री नरेंद्र बागुल | उप अभियंता विद्युत |
| १२. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| १३. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| १४. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभि. नगररचना विभाग |
| १५. | श्री हेमंत पावटे | सहा. अभि. नगररचना विभाग |
| १६. | श्री काळु साबळे | लिपीक, आस्थापना |
| १७. | श्री.अरुण चौधरी | मनपा शिक्षण मंडळ |
| १८. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| १९. | श्री रविकिरण पाटकरी | वृक्ष विभाग प्रमुख |
| २०. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २१. | श्री बसीत पठान | सिस्टीम मॅनेजर |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

मा.प्रशासकः- आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

# सदर बैठकीत पारीत झालेले ठराव व प्रस्ताव

---

**प्रशासक ठराव क्र.६८२** **दिनांक: ०५/०२/२०२६**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. नगरसचिव विभागाकडील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ४५ चे इतिवृत्त

विषय क्रमांक:-७०४ मागील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ४५ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

---

वाचा क्र.०१ व नगरसचिव विभागाकडील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ४५ चे इतिवृत्त तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ४५ दिनांक ०२/०२/२०२६ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६६७ ते ६८१ क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.६८३** **दिनांक: ०५/०२/२०२६**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / आस्था/जा.क्र. १३८१ दिनांक ०२/०२/२०२६

विषय क्रमांक:-७०५ मानधनावरील कर्मचारी यांना ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्यालयीन अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिकेतील प्रस्तावात नमुद कर्मचारी यांना मानधन तत्वावर आदेशान्वये ०६ महिने कालावधी करीता मुदतवाढ देण्यात आली होती. तरी खालील नमुद मानधन कर्मचारी यांची नियुक्तीची मुदत संपुष्टात येत आहे.

उक्त नमूद अ.क्र.१ ते ४० वरील मानधनावरील कर्मचारी यांची सेवा संबंधित विभागाकरिता आवश्यक असल्याने संबंधित विभाग प्रमुख यांनी उक्त नमूद अ. क्र.१ ते ४० वरील कर्मचारी यांना मुदतवाढ देणेबाबत शिफारस केलेली आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार प्रस्तावात नमुद एकुण १ ते ४० मानधनावरील कर्मचारी (रसायन तज्ञ, व्हॉल्वमन, पंप ऑपरेटर, विजतंत्री, गाळणी निरीक्षक, गाळणी चालक, वाहनचालक, स्वच्छता निरीक्षक) ना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार पुढील ६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेस मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.६८४** **दिनांक: ०५/०२/२०२६**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / मु.ले.प./जा.क्र. ४५ दिनांक ०३/०२/२०२६

विषय क्रमांक:-७०६ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी अहवाल स्थायी समितीस अवलोकनार्थ सादर.

---

वाचा क्र.०१ व मुख्य लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५(१) अन्वये विहीत करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या डिसेंबर महिन्यातील लेख्यांची साप्ताहीक तपासणी दि. ०१/१२/२०२५ ते दि. ०५/१२/२०२५ पर्यत तसेच दि.०८/१२/२०२५ ते दि. १२/१२/२०२५ तसेच दि. १५/१२/२०२५ ते दि. १९/१२/२०२५ पर्यंत तसेच दिनांक २२/१२/२०२५ ते दि. २६/१२/२०२५ पर्यंत तपासणी करण्यांत आलेली आहे. तसेच जानेवारी महिन्यातील लेख्यांची साप्ताहिक तपासणी दि. ०५/०१/२०२६ ते दि. ०९/०१/२०२६ पर्यत तसेच दि.१२/०१/२०२६ ते दि. १६/०१/२०२६ तसेच दि. १९/०१/२०२६ ते दि. २३/०१/२०२६ पर्यंत तसेच दिनांक २६/०१/२०२६ ते दि. ३०/०१/२०२६ पर्यंत तपासणी करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार मा. लेखा परीक्षक यांच्या मार्फत उक्त कालावधीत झालेल्या साप्ताहिक तपासणी लेख्यांचा अहवाल मे.स्थायी समिती समोर वाचून सादर करण्यांत आला. या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने सादर केलेल्या अर्धसमास पत्रांबाबत तातडीने अनुपालन करण्याबाबत दक्षता घ्यावी.

याबाबत मुख्य लेखाधिकारी यांनी संबंधित विभागांकडून अनुपालनाबाबत आवश्यक ती पूर्तता करावी. तसेच याबाबत लेखापरीक्षण विभागाने संबंधित विभागांशी समन्वय ठेऊन कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**